# नवी मुंबई महानगरपालिका

## स्थायी समिती

स्थायी समितीच्या **दिनांक ०९ मार्च २०११** रोजी भरलेल्या सभेतील **मंजूर /नामंजूर** इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसूदा स्वरुपात खालील प्रमाणे आहे:-

**विषय क्र.०१**
**दि.०९ मार्च २०११**

तुर्भे येथील क्षेपणभूमीवर घनकचऱ्याची दैनंदिन MSW (M & H) Rule 2000 प्रमाणे शास्त्रोक्त जमिन भरणा पध्दतीने विल्हेवाट लावण्याच्या कंत्राटाबाबत, आयुक्तांचे दि.२५/०२/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./४४४/२०११.

ठराव क्र.४३७.
**दि.०९ मार्च २०११**

" महानगरपालिकेला अशी शिफारस करण्यात यावी की, नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील तुर्भे येथील क्षेपणभूमीवर दैनंदिन शास्त्रोक्त जमीन भरणा पध्दतीने घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्याच्या कामासंबंधातील एकूण रक्कम रु.३,५०,४०,०००/- इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी.

"२. उपरोक्त परिच्छेद १ मधील प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी मिळण्यासापेक्ष, तुर्भे येथील क्षेपणभूमीवर दैनंदिन शास्त्रोक्त जमीन भरणा पध्दतीने घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्याच्या कामासंबंधात मशीनरीसह रक्कम रु.३,५०,४०,०००/- किंवा नवी मुंबई महानगपालिकेने मशीनरी पुरविल्यास रक्कम रु.३,१७,५५,०००/- इतक्या खर्चाने मे.आस्क इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांज बरोबर करार करण्यास, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या ७३(क) अन्वये संमती देण्यात यावी."

**निर्णय:- संमत .**

**विषय क्र.०२**
**दि.०९ मार्च २०११**

तुर्भे क्षेपणभूमी येथे तिसरा सेल शास्त्रोक्त पध्दतीने MSW (M & H) Rule 2000 प्रमाणे बंद करणे व सभोवतालची कामे करण्याच्या कंत्राटाबाबत, आयुक्तांचे दि.२५/०२/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./४४५/२०११.

ठराव क्र.४३८.
**दि.०९ मार्च २०११**

"उपरोक्त विषयासंदर्भात मे.आस्क इन्फास्ट्रक्चर प्रा.लि. या कंत्राटदाराबरोबर त्यांनी कार्यालयीन अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.८% जास्त दराने एकुण रु.९,२९,४२,८५४/- इतक्या खर्चाने करार करण्यास तसेच नियमानुसार भाववाढी पोटी देय असलेल्या खर्चास सुचविल्याप्रमाणे, संमती देण्यात यावी."

**निर्णय:- संमत.**

**विषय क्र.०३**
**दि.०९ मार्च २०११**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ऐरोली से-१५ येथील भूखंड क्र.२२ अे या जागेवर ``भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर`` स्मारकाचे बांधकाम करण्याच्या कंत्राटाबाबत, आयुक्तांचे दि.२५/०२/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./४४६/२०११.

ठराव क्र.४३९.
**दि.०९ मार्च २०११**

"उपरोक्त विषयासंदर्भात मे.ईगल कन्स्ट्रक्शन कंपनी या कंत्राटदाराबरोबर कार्यालयीन अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.७४% जास्त दराने एकुण रू.१७,४४,८५,४६४/- इतक्या खर्चाने करार करण्यास व नियमानुसार भाववाढी पोटी देय असलेल्या खर्चास सुचविल्याप्रमाणे, संमती देण्यात यावी."

**निर्णयः- संमत.**

**विषय क्र.०४**
**दि.०९ मार्च २०११**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात २४ तास डेब्रिज विरोधी भरारी पथकासाठी हत्यारी/बिगर हत्यारी सुरक्षा रक्षक, तसेच इंधन व वाहनचालकासह वाहन पुरविण्याच्या कंत्राटाबाबत, आयुक्तांचे दि.२८/०२/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/अतिक्रमण/५७७/२०११.

ठराव क्र.४४०.
**दि.०९ मार्च २०११**

"उपरोक्त विषयासंदर्भात मे.सी.डी.सेफ्टी ॲड सिक्यूरिटी सर्व्हीसेस, वाशी नवी मुंबई यांना पूर्वीच्याच मंजूर दराने व अटी शर्तीनुसार नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात २४ तास (तीन पाळीत) एकुण चार (परिमंडळ १ व २ ) डेब्रिज विरोधी भरारी पथकासाठी एक सुरक्षा रक्षक + एक हत्यारी सुरक्षा रक्षक + इंधन व वाहनचालकासह वाहन पुरविणे इत्यादी बाबतच्या कामास माहे मार्च २०११ पर्यंत मुदत वाढ देणे तसेच माहे ०९ मार्च-२००९ ते ३० नोव्हेंबर २०१० पर्यत झालेला खर्च रक्कम रु.६१,५१,०७०/- व माहे डिसेंबर २०१० ते मार्च-२०११ साठी होणारा अंदाजीत खर्च रक्कम रू.२५,००,०००/-असे एकुण मिळुन रक्कम रू.८६,५१,०७०/- च्या खर्चास सुचविल्याप्रमाणे, संमती देण्यात यावी."

**निर्णयः- संमत.**

**विषय क्र.०५**
**दि.०९ मार्च २०११**

नवी मुंबई महानगरपालिकेस प्रवासी वाहतूक परवाना असलेली वाहने भाड्याने घेण्याच्या कंत्राटाबाबत, आयुक्तांचे दि.०४/०३/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/अशअ/२१२/२०११.

ठराव क्र.४४१.
**दि.०९ मार्च २०११**

"उपरोक्त विषयासंदर्भात मे. पुर्वा ट्रॅव्हल्स यांचेकडून नियमित ३३ जीप व ०५ ए.सी. कार वाहने तसेच भविष्यात नवी मुंबई महानगरपालिकेचे विविध कार्यक्रम, विशेष मोहिमा इत्यादीसाठी आवश्यकतेनुसार अतिरिक्त ०६ जीप व ०२ ए.सी. कार भाड्याने घेणेस येणारा वार्षिक खर्च रक्कम रू.१,१७,१८,०००/- व मे.आदित्य ट्रॅव्हल्स यांचेकडून नियमित २१ जीप वाहने भाड्याने घेणेसाठी येणारा वार्षिक खर्च रक्कम रू.५२,९२,०००/- असे मिळून एकूण रक्कम रू.१,७०,१०,०००/- एवढ्या रकमेस आणि मे. पुर्वा ट्रॅव्हल्स व मे.आदित्य ट्रॅव्हल्स यांचेशी करार करणेस सुचविल्याप्रमाणे, संमती देण्यात यावी."

**निर्णयः- संमत.**

**विषय क्र.०६**
**दि.०९ मार्च २०११**

ऐरोली से-६ मधील कै. ताराबाई फुलचंद मढवी उद्यान नव्याने विकसीत करण्याच्या कंत्राटाबाबत, आयुक्तांचे दि.२३/०२/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/उद्यान/२३२८/२०११.

ठराव क्र.४४२.
**दि.०९ मार्च २०११**

"उपरोक्त विषयासंदर्भात मे. श्रीएकविरा माऊली कन्स्ट्रक्शन या कंत्राटदाराबरोबर एकुण रक्कम रु.२२,६०,५१२/- इतक्या खर्चाने करार करण्यास सुचविल्याप्रमाणे, संमती देण्यात यावी."

**निर्णयः- संमत.**

**विषय क्र.०७**
**दि.०९ मार्च २०११**

ऐरोली से-५ ओमकारेश्वर मंदिराजवळील अतिउच्च विद्युत दाबाखालील मोकळ्या जागेत उद्यान विकसित करण्याच्या कंत्राटाबाबत, आयुक्तांचे दि.२५/०२/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/उद्यान/२३५०/२०११.

ठराव क्र.४४३.
**दि.०९ मार्च २०११**

"उपरोक्त विषयासंदर्भात मे. श्रीएकविरा माऊली कन्स्ट्रक्शन या कंत्राटदाराबरोबर एकूण रक्कम रु.२१,५८,३२४/- इतक्या खर्चाने करार करण्यास सुचविल्याप्रमाणे, संमती देण्यात यावी."

**निर्णयः- संमत.**

**विषय क्र.०८**
**दि.०९ मार्च २०११**

ऐरोली से-४ मधील आर-७ ते आर-१९९ पर्यंत गटाराची सुधारणा करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दि.२५/०२/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ/४६०/२०११.

ठराव क्र.४४४.
**दि.०९ मार्च २०११**

"उपरोक्त विषयासंदर्भात अंदाजपत्रकिय रक्कम रु.२४,८७,४२१/- इतक्या रक्कमेस तसेच नियमानुसार भाववाढी पोटी देय असलेल्या खर्चास सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी."

**निर्णयः- मंजूर.**

**विषय क्र.०९**
**दि.०९ मार्च २०११**

माता बाल रुग्णालय, तुर्भे विभागाच्या सन १९९७-९८, १९९९८-९९, २००१-२००२, २००३-२००४, २००४-२००५ आणि २००५-२००६ या कालावधीतील लेखा परिक्षण अनुपालन अहवालाबाबत, आयुक्तांचे दि.८/०५/२००९ चे पत्र क्र.नमुंमपा/आरोग्य/२१३२/२००९.

ठराव क्र.४४५.
**दि.०९ मार्च २०११**

``माता बाल रुग्णालय, तुर्भे विभागाच्या लेखा परिक्षण अनुपालन अहवालापैकी सन १९९७-१९९८ या वर्षातील आक्षेप क्र.५,७,८,१० व १२ तसेच १९९८-१९९९ या वर्षातील आक्षेप क्र.१,३,५,८ व ९, तसेच सन २००१-२००२ या वर्षातील आक्षेप क्र.२,३,५,६,७ व ११, तसेच सन २००३-२००४ या वर्षातील आक्षेप क्र.३ व ४, तसेच सन २००४-२००५ या वर्षातील आक्षेप क्र.१,२,३,४,५,६,१६,१७ व १८, तसेच सन २००५-२००६ या वर्षातील आक्षेप क्र.२,१,४,९ व ८ हे आक्षेप कायम ठेऊन आयुक्तांचा प्रस्ताव मंजूर करण्यांत यावा "

**निर्णयः- मंजूर.**

**विषय क्र.१०**
**दि.०९ मार्च २०११**

प्रभाग क्र.७६ कुकशेत मधील फिटींग बदलणे व दिवाबत्ती सुधारणा करण्याच्या कंत्राटाबाबत, आयुक्तांचे दि.२८/१२/२०१० चे पत्र क्र.नमुंमपा/का.अ.(वि.)/१३०५/२०१०.

ठराव क्र.४४६.
**दि.०९ मार्च २०११**

"उपरोक्त विषयासंदर्भात मे. सुनिता ट्रेडिंग कंपनी यांचेबरोबर रक्कम रू.२४,९६,८५४/- इतक्या खर्चाने करार करण्यास सुचविल्याप्रमाणे, संमती देण्यात यावी."

**निर्णयः- संमत.**

**विषय क्र.११**
**दि.०९ मार्च २०११**

प्रभाग क्र.७९ दारावे मधील फिटींग बदलणे व दिवाबत्ती सुधारणा करण्याच्या कंत्राटाबाबत, आयुक्तांचे दि.२८/१२/२०१० चे पत्र क्र.नमुंमपा/का.अ.(वि.)/१३०६/२०१०.

ठराव क्र.४४७.
**दि.०९ मार्च २०११**

"उपरोक्त विषयासंदर्भात मे. इम्पेक्स इलेक्ट्रीकल्स या कंत्राटदाराबरोबर रक्कम रु.२४,८२,७९०/- इतक्या खर्चाने करार करण्यास सुचविल्याप्रमाणे, संमती देण्यात यावी."

**निर्णय:- संमत.**

**विषय क्र.१२**
**दि.०९ मार्च २०११**

आग्रोली गांव व बेलापूर क्षेत्रातील फिटींग बदली करणे व दिवाबत्ती सुधारणा करण्याच्या कंत्राटाबाबत, आयुक्तांचे दि.२९/१२/२०१० चे पत्र क्र.नमुंमपा/का.अ.(वि.)/१३१०/२०१०.

ठराव क्र.४४८.
**दि.०९ मार्च २०११**

"उपरोक्त विषयासंदर्भात मे. दमाणी एंटरप्रायझेस या कंत्राटदाराबरोबर रक्कम रु.२४,८२,३९१/- इतक्या खर्चाने करार करण्यास सुचविल्याप्रमाणे, संमती देण्यात यावी."

**निर्णय:- संमत.**

**विषय क्र.१३**
**दि.०९ मार्च २०११**

सानपाडा से-१३ येथील भुखंड क्र.८ वर उद्यान विकसित करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दि.३१/१२/२०१० चे पत्र क्र.नमुंमपा/उद्यान/१०८२/२०१०.

ठराव क्र.४४९.
**दि.०९ मार्च २०११**

"उपरोक्त विषयासंदर्भात अंदाजपत्रकीय रक्कम रु.२२,६४,८५०/- इतकी असून सदर खर्चास सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी."

**निर्णय:- मंजूर.**

**विषय क्र.१४**
**दि.०९ मार्च २०११**

नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र.३६ व ३७कोपरखैरणे (जुना शाळा क्र.२५) येथील शाळेला संरक्षक भिंत बांधण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दि.२८/०२/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/अशअ/१९३/२०११.

ठराव क्र.४५०.
**दि.०९ मार्च २०११**

"उपरोक्त विषयासंदर्भात अंदाजपत्रकिय रक्कम रु.१५,६१,२३९/- (५ टक्के आकस्मिक खर्चासह) इतकी असून सदर रकमेच्या खर्चास व नियमानुसार भाववाढी पोटी देय असलेल्या खर्चास सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी."

**निर्णय:- मंजूर.**